MHGA130002872024

सत्र मामला क्र.३५/२०२४
महा.शासन मार्फत पोलीस
स्टेशन, गटट्ा जांबीया
वि. राजु कोकोशी जोई व इतर

निशानी ६४ वरील आदेश

(दि.२४/०२/२०२५)

१. अर्जदार/आरोपी क्र. १.राजु कोकोशी जोई,२. मैनु डुंगा जोई,३. दिनकर बाजु जोई,४. शंकर राजु जोई,५. रैनू मालु पुंगाटी,६. झुरु मालु पुंगाटी,७. बाजु कोकोशी जोई आणि ८. विनु मुरा होळी सर्व रा. जांबीया,ता. एटापल्ली, जि.गडचिरोली यांनी कलम ४३९ फौजदारी प्रक्रिया संहिते प्रमाणे गटट्ा जांबीया पोलीस स्टेशन येथील अप. क्र. ०१/२०२४ मध्ये भा.दं.वि. कलम ३०७,३४१,१४३,१४७,१४८,१४९,५०४,५०६ सहकलम ३(२) महा.नरबळी आणि अमानुष अनिष्ठ व अघोरी प्रथा व जादुटोना प्रति. अधि. २०१३ अन्वये नोंद असलेल्या गुन्हयामध्ये नियमीत जामीन मिळणेसाठी अर्ज दिला आहे.

२. अर्जदारांचे असे म्हणने आहे की, सदर गुन्हयात आणखी १२ व्यक्तींना आरोपीं म्हणुन समाविष्ट केले आहेत. मा. विद्यमान न्यायालयाने आरोपी क्र ९ ते २० यांना जामीन दिला आहे. त्यामुळे सदर आरोपींना समान न्याय तत्वाचे आधारे जामीन देण्यात यावा अशी विनंती करण्यात येते. बयानाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, फिर्याद आणि पिडीताचे आणि तिच्या मुलाचे बयान यामध्ये बरीच तफावत आढळुन येते. पोलिस पाटीलच्या हस्ते नोटीस देउन सदर आरोपींना तपासाकामी पो स्टेशनला बोलावले असता ते पो स्टेशनला हजर झाले, तेव्हा त्यांना अटक करण्यात आली. यावरुन असे दिसुन येते की, गुन्हा घडल्यानंतर सदर आरोपीं पळुन गेले नाही त्यांनी तपासात सहकार्य केले. सदर आरोपींनी जो गुन्हा केलाच नाही त्या गून्हयामध्ये दिर्घकाळापासुन ते गजाआड आहेत.

३. दोषारोप पत्र दाखल झाल्यानंतर सदर आरोपींचा हा जामीन मिळण्याबाबतचा दुसरा अर्ज आहे. प्रथम अर्ज मा. न्यायालयाने दि. ११.१०.२०२४ रोजी खारीज करुन

सरकार पक्षाला सदर प्रकरण जलद गतीने चालविण्याकरीता निर्देश दिले आहे. सदर आरोपींना त्यांचेवर  लावलेले आरोप वाचुन दाखविण्यात आले असता त्यांनी ते नाकबुल केले. प्रकरण जलद गतीने चालविण्याकरीता त्यानंतर सरकार पक्षाने कोणतेही योग्य ते पाउल उचलले नाही. अशा बदललेल्या परिस्थीतीतमध्ये सदर जामीन अर्ज दाखल करण्यात आला आहे. त्यामुळे सदर अर्जदारं/ आरोपींना  मा. न्यायालयाचे शर्ती व अटीनुसार जामीन देण्यात यावा अशी विनंती केलेली आहे.

४. सरकारी वकीलांना यांनी सदर अर्जला नि.६५ वर म्हणणे दिले की, त्यांनी सदर अर्जास विरोध केला आहे. सदर आरोपींनी गंभीर गुन्हा केला आहे.  मा. न्यायालयाने दि ११.१०.२०२४ रोजी नि. ३ वर आदेश पारीत करुन जामीन अर्ज नाकारला आहे. प्रकरणात दोषारोप पत्र दाखल होउन प्रकरण पुराव्याकरीता  आहे, म्हणुन परिस्थीतीत काहीही बदल झाला नाही आहे.  आरोपी, जखमी आणि साक्षदार हे एकाच गावातून आहेत. अर्जदारांना जामीन दिल्यास त्यांचेवर दबाव आणण्याची शक्यता नाकारता येत नाही. सदर घ टना ही जादुटोना केल्याच्या कारणानी घडली आहे आणि आरोपींच्या मनातुन जादुटोना केल्याचे निघाले नसल्याने त्यांना जामीन दिल्यास जखमी आणि साक्षदार यांच्या जिवीतास ध ोका आहे. करीता वरील कारणांमुळे आरोपींचा जामीन अर्ज नामंजुर करण्यात यावा ही विनंती करण्यात येते.

५. गुन्हयाची हकीकत अशी की,  दि. २६.४.२०२४  चे रात्री ८.०० वा. चे सुमारास या प्रकरणातील आरोपी नामे राजु कोकोसा जोई, बाजु कोकोसी जोई, मैनु डूंगा जोई, दिनकर बाजु जोई, विनु होळी,शंकर जोई, रैनू पुंगाटी, झुरु पुंगाटी यांनी दोन महिन्यापुर्वी डोंगा यास फिर्यादीने जादुटोना करुन ठार मारल्याच्या संशयावरुन फिर्यादीचे घरी जाउन त्याचे हातपाय बांधून त्याला उचलून गावातील गोटूलमध्ये नेले व तेथील एका खांबाला दोरीने बांधून हाताबुक्क्याने व काठीने मारहान केले तसेच शिवीगाळ करुन जिवे ठार माण्याची धमकी दिली. फिर्यादीला जिवे ठार मारण्याच्या उदद्शाने  लोखंडी सब्बल गरम करुन हाता पायाला,छातीला, डोक्याला,पाठीवर व चेह—याला चटके दिले. तसेच फिर्यादीला रात्रभर खांब*ाला बा*धून ठेवून मारहान केले. त्यामारहानीमुळे फिर्यादी बेशूध्द झाला असता तो मयत झाला असे समजुन त्याला तेथे बांधून ते निघून गेले. अशा

आशायाच्या फिर्यादवरुन आरोपीं विरुध्द गुन्हा नोंद करण्यात आला.

६. अर्जदारं/आरोपींतर्फे वकीलांनी असा युक्तीवाद मांडला की, या गुन्हयात या न्यायालयाने आरोपी क्र . ९ ते २० यांना जामीन दिलेली आहे त्यामुळे समान न्याय तत्वाच्या आधारे या अर्जदाराला जामीन मागण्याचा हक्क व अधिकार आहे. दिलेली तक्रार व साक्षदाराचे बयान यात फार मोठी विसंगती आहे त्यामुळे आरोपीं विरुध्द खोटा आरोप लावण्यात आल्याचे उघडपणे दिसून येते. आरोपींनी कलम ३०७ भा दं वि प्रमाणे गुन्हया केल्याचा वैद्यकीय पुरावा उपलब्ध नाही. तक्रार देण्याकरीता बराच विलंब झालेला आहे तो सुध्दा का झाला याबाबत काहीही तपास करण्यात आला नाही. इतकेच नव्हेतर या न्यायालयाने अर्जदारांच्या जामीन अर्ज नि ३ नामंजूर करतांना सरकारी वकीलांनी या प्रकरणात जलद गतीने न्यायाकरीता प्रयत्न करावे असे आदेशीत केलेले आहे परंतू तसे केले नाही त्यामुळे परिस्थीतीत बदल झाल्याने सदर अर्ज चालण्यास पात्र आहे. अर्जदारांना गजाआड ठेवण्याचे कोणतेही कारण नाही. त्यामुळे जामीन अर्ज मंजुर करण्यात यावा अशी विनंती करण्यात आली.

७. याउलट सरकारी वकिल श्री कुंभारे यांनी असा युक्तीवाद मांडला की, या न्यायालयाने जामीन अर्ज नि क्र ३ नामंजूर केल्यानंतर सरकार पक्षातर्फे डॉफ्ट् चार्ज देण्यात आला आणि त्या आधारे चार्ज नोंदविण्यात आले. पोलिसांना मुदद्देमाल जमा करण्याकरीता आदेशीत करण्यात आले. परंतु मुदद्देमाल जमा होउ शकला नाही. साक्ष तपासण्याकरीता न्यायालयाकडे विनवनी सुध्दा करण्यात आली आहे. त्यामुळे परिस्थीतीत काहीही बदल झाला नाही. करीता अर्ज नामंजुर करण्यात यावा अशी विनंती करण्यात आली.

८. नि ३ चा जामीन अर्ज व त्यावरील आदेश याचे अवलोकन केले असता, कलम ३०७ भा दं वि प्रमाणे आरोपीने गुन्हा केला नाही, हा आरोपीच्या वतीने मांडण्यात आलेला युक्तीवाद नाकारण्यात आला. तसेच बयानात असलेली तफावत ही उलट तपासाअंती ठरवीता येईल असे सुध्दा आदेशात नमुद केलेले आहे. तसेच केलेला गुन्हा हा अमानवीय प्रकाराचा आहे, असा सरकारी वकीलांचा जो युक्तीवाद आहे तो ग्राह्य धरण्यात आला आहे. करीता त्याच कारणावरुन अर्जदारांना पुन्हा जामीन मागता येणार नाही.

९.  नि.क्र ३ च्या अर्जच्या आदेशाने असे नमुद करण्यात आले की, सरकारी वकीलांनी प्रकरण जलद गतीने चालविण्याचे प्रयत्न करावे व बचाव पक्षाने त्यांना सहकार्य करावे. सदरचे आदेश दि ११.१०.२०२४ रोजी पारीत झाले. त्यानंतर दि ७.११.२०२४ रोजी न्यायालयाने पो स्टेशन अधिकारी, जांबीयगटट्ा यांना मुदद्ेमाल जमा करण्या करीता पत्र दिले. परंतू आज पर्यंत मुदद्ेमाल जमा करण्यात आलेला नाही. दि २६.११.२०२४ रोजी सरकारी वकीलांनी डॉफ्ट् चार्ज दिला. त्या अनुषंगाने आरोपीं विरुध्द दोषारोप /चार्ज नोंदविण्यात आले. त्यानंतर साक्षदारांच्या यादीकरीता प्रकरण ठेवण्यात आले होते. दि २१. १.२०२५ रोजी साक्ष क्र १ व २ यांना समन्स काढण्यात आले. परंतु त्यानंतर दि ३०.१. २०२५ ला सदरचा जामीन अर्ज दाखल करण्यात आले. त्यावरील म्हणणे व युक्तीवाद आणि आदेशाकरीत दि २४.२.२०२५ ला प्रकरण आदेशाकरीता ठेवण्यात आले. अशाप्रकारे अभियोग पक्षाने नि ३ वर पारीत केलेल्या आदेशाचे पालन केल्याचे दिसुन येते. त्यामुळे अर्जदाराच्या वतीने नि ३ च्या आदेशाचे अभियोग पक्षाने पालन केले नाही, असा जो युक्तीवाद मांडण्यात आला त्यात तथ्य दिसुन येते नाही.

१०.  दि २८.४.२०२४ रोजी जी तक्रार नमुद करण्यात आली त्या तक्रारीमध्ये अर्जदारांच्या नावाचा उल्लेख आहे. परंतू आरोपी क्र ९ ते २० यांचा नावाचा उल्लेख नाही, अशाप्रकारे फिर्यादप्रमाणे अर्जदारांचा गुन्हयाशी थेट संबध असल्याने अर्जदार यांना आरोपी क्र ९ ते २० यांना जामीन दिल्याच्या कारणावरुन समान न्याय तत्वाच्या आधारे जामीन मागता येणार नाही. अशाप्रकारे अर्जदांराना या प्रकरणात फिर्यादी व प्रत्यक्षदर्शी साक्षदार यांची साक्ष नोंदवे पर्यंत जामीन मंजूर करणे न्यायोचित होणार नाही. करीता मी खालीलप्रमाणे अंतिम आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

जामीन अर्ज नि.क्र. ६४ नामंजुर करण्यात येतो.

Digitally signed by RAVISHANKAR NAMDEORAO BAWANKAR
Date: 2025.02.24 17:56:17 +0530

अहेरी.
दि. २४/०२/२०२५

(र. ना. बावनकर)
अतिरिक्त सत्र न्यायाधीश
अहेरी.